# महाराष्ट्र शासन

## जिल्हा परिषद नांदेड अंतर्गत पदभरती सन 2019

## गट क संवर्गातील सरळसेवेने रिक्त पदे भरण्याबाबतची सुधारित जाहिरात व जाहिर प्रगटन

जिल्हा परिषद, नांदेड आरोग्य विभाग यांच्या आस्थापनेवरील खालील गट क संवर्गातील आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, औषध निर्माण अधिकारी व आरोग्य पर्यवेक्षक ही पदे भरण्याकरिता नव्याने समाविष्ट दिव्यांग प्रवर्गाचे तसेच सामाजिक आर्थिक दृष्टया मागास प्रवर्ग (एसईबीसी) रद्द झाल्याने खुल्या प्रवर्गा अंतर्गत वाढलेल्या समांतर आरक्षणाच्या प्रवर्गाकरिता सरळसेवा भरतीसाठी पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. सविस्तर जाहिरात www.maharddzp.com व https://zpnanded.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. ऑनलाईल पध्दतीने अर्ज भरण्याची सुविधा संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

1) आरोग्य पर्यवेक्षक

| प्रवर्ग | पदसंख्या |
|---|---|
| खुला सर्वसाधारण | 01 |
| टीप:- सामाजिक व आर्थिकदृष्ट्या (एसईबीसी) मागास प्रवर्ग रद्द झाल्याने खुल्या सर्वसाधारण प्रवर्गात नव्याने ०१ पद उपलब्ध झाले आहे. | |

2) औषध निर्माण अधिकारी

| प्रवर्ग | पदसंख्या 01 |
|---|---|
| दिव्यांग (1 पद) | (a) D,HH-<br>(b) OL BL CP LC Dw AAV<br>(c) ASD(M), SLD, MI<br>(d) MD involving (a) to (c) above |
| टीप:- दिव्यांग आरक्षण ३ % ऐवजी ४ % झाल्यामुळे ०१ पद दिव्यांगासाठी उपलब्ध झाले आहे. | |

3) प्रयोगशाळा तंत्रज्ञ

| प्रवर्ग | पदसंख्या |
|---|---|
| खुला सर्वसाधारण | 01 |
| टीप:- सामाजिक व आर्थिकदृष्ट्या (एसईबीसी) मागास प्रवर्ग रद्द झाल्याने खुल्या सर्वसाधारण प्रवर्गात नव्याने ०१ पद उपलब्ध झाले आहे. | |

4) आरोग्य सेवक (महिला)

| प्रवर्ग | पदसंख्या 03 |
|---|---|
| दिव्यांग (3 पदे) | (a) LV<br>(b) D,HH<br>(c) OL,CP,LC,Dw, AAV<br>(d) SLD, MI<br>(e) MD involving (a) to (c) above |
| टीप:- दिव्यांग आरक्षण ३ % ऐवजी ४ % झाल्यामुळे दिव्यांगासाठी नव्याने ०३ पदे उपलब्ध झाले आहे. | |

तसेच आरोग्य सेवक पुरुष (40 टक्के) पदामध्ये शासन पत्र दिनांक 4 फेब्रूवारी 2020 अन्वये जाहिरातीमध्ये 10 टक्के पदे कमी करुन अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्याचे निर्देश प्राप्त आहेत. त्यानूसार अनु.जाती 05, भजड 01 व खुला 05 अशी एकूण 15 पदावर अनुकंपा तत्वावरील उमेदवारांना नियुक्ती दिल्याने जाहिरातीमधून सदरील 15 पदे कमी झाली आहेत. त्यामुळे जाहितीमध्ये नमूद असलेली समांतर आरक्षणातील अनु.जाती खेळाडू व अनु.जाती प्रकल्पग्रस्त समांतर आरक्षणातील पदे कमी झाले आहेत. त्यामुळे सदरील पदासाठी अर्ज केलेल्या उमेदवारांनी इतर जिल्हा परिषदेमध्ये (www.maharddzp.com) या संकेतस्थळावर विकल्प दयावा.

**अर्ज ऑनलाईन सादर करण्याचे वेळापत्रक**

| ऑनलाईन पध्दतीने अर्ज व परिक्षा शुल्क भरण्याची सुरुवात | ऑनलाईन पध्दतीने अर्ज व परिक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक |
|---|---|
| दिनांक 01 सप्टेंबर 2021 पासून | दिनांक 21 सप्टेंबर 2021 पर्यत |

नव्याने समाविष्ठ दिव्यांग प्रवर्गाचे तसेच सामाजिक आर्थिक दृष्टया मागास प्रवर्ग (एसईबीसी) रद्द झाल्याने खुल्या प्रवर्गा अंतर्गत वाढलेल्या समांतर आरक्षणाच्या प्रवर्गाकरिता सरळसेवा भरतीसाठी पात्र आरक्षणाच्या पदांसाठीची सविस्तर जाहिरात ही www.maharddzp.com या संकेतस्थळावर तसेच जिल्हा परिषद नांदेड च्या http://zpnanded.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, औषध निर्माण अधिकारी व आरोग्य पर्यवेक्षक पदासाठी सामाजिक/ समांतर आरक्षण निहाय पदांची माहिती, शैक्षणिक अर्हता व अनुभव, कमाल व किमान वयोमर्यादा, भरती प्रक्रिया शुल्क, ऑनलाईन अर्ज करणेसाठी मार्गदर्शक सूचना, परिक्षेचा दिनांक व वेळ, परिक्षेचे स्वरुप व माध्यम, निवड पध्दत, सर्वसाधारण अटी व शर्ती इत्यादि बाबत अधिक माहिती www.maharddzp.com या व http://zpnanded.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अर्ज करणेसाठी www.maharddzp.com हे संकेतस्थळ दिनांक 01/09/2021 पासुन ते दिनांक 21/09/2021 पर्यत कार्यरत राहील. अर्ज करण्यापूर्वी उमेदवारांनी उक्त नमुद संकेतस्थळावरील सविस्तर जाहिरातीत दिलेल्या सर्व सूचना व जाहीर प्रकटन काळजीपूर्वक वाचून अर्ज सादर करावेत.

तसेच मार्च 2019 च्या जाहिरातीनुसार आरोग्य पर्यवेक्षक, आरोग्य सेविका ( बिगर पेसा ) व आरोग्य सेविका (पेसा क्षेत्र) या पदांसाठी यापुर्वी ऑनलाईन अर्ज केलेल्या सर्व उमेदवारांनी या भरती प्रक्रियेसंबंधी शासन निर्देश व पदनिहाय बदललेल्या भरतीच्या पदांसाठी तसेच जिल्हा परिषद नांदेड कडील पदे बदलल्याने / निरंक (00) झाल्याने इतर जिल्हा परिषदांच्या विकल्प ऑनलाईन देण्यासाठी सुचना व वेळापत्रकासाठी www.maharddzp.com या व http://zpnanded.in या संकेतस्थळावरील जाहीर प्रकटन पाहुन उचित विकल्प दयावेत. याबाबत सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवारांची राहील.

**विषयांकित मार्च 2019 भरतीसाठीच्या नमुद जाहीरातीमधील आरोग्य विभागा अंतर्गत पदांसाठी पदनिहाय परिक्षेचा दिनांक व वेळ**

| पद | परिक्षा दिनांक | वेळ |
|---|---|---|
| प्रयोगशाळा तंत्रज्ञ | 16 ऑक्टोबर 2021 | सकाळी 11.00 ते 1.00 |
| औषध निर्माण अधिकारी | 16 ऑक्टोबर 2021 | दुपारी 3.00 ते 5.00 |
| आरोग्य सेवक पुरुष | 17 ऑक्टोबर 2021 | सकाळी 11.00 ते 1.00 |
| आरोग्य सेविका | 17 ऑक्टोबर 2021 | सकाळी 11.00 ते 1.00 |
| आरोग्य पर्यवेक्षक | 17 ऑक्टोबर 2021 | दुपारी 3.00 ते 5.00 |

भरतीप्रक्रिया / परिक्षा स्थगित करणे किंवा रद्द करणे, अंशतः बदल करणे, परिक्षेचा प्रकार, पदांच्या एकूण अथवा संवर्ग व सामाजिक / समांतर प्रवर्गातील पदसंख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार तसेच भरती संदर्भात वाद, तक्रारीबाबत अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी, नांदेड तसेच नियुक्ती प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड व शासन यांना राहतील. याबाबत उमेदवारांना अथवा इतर कोणासही कोणताही दावा सांगता येणार नाही किंवा वाद उपस्थित करता येणार नाही.

ठिकाण :-नांदेड

दिनांक :-26 ऑगस्ट, 2021

**डॉ. बालाजी शिंदे**
**सदस्य सचिव,**
**जिल्हा निवड समिती,**
**तथा**
**जिल्हा आरोग्य अधिकारी**
**जिल्हा परिषद नांदेड**

**वर्षा ठाकूर-घुगे (भाप्रसे)**
**सदस्य**
**जिल्हा निवड समिती,**
**तथा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद नांदेड**

**डॉ.विपीन ईटनकर (भाप्रसे)**
**अध्यक्ष**
**जिल्हा निवड समिती,**
**तथा**
**जिल्हाधिकारी,**
**नांदेड**